SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000, AffiliationT1 Section-0231-2609089, 2609146
Web : www.unishivaji.ac.in Email: affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - इपीबीएक्स - २०६०९०००, संलग्नता टी.१ विभाग : ०२३१- २६०९०८९. २६०९१४६
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : affiliationt1@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी-१/ 1250 दिनांक: 2 AUG 2025

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ शिक्षण संस्था,

**विषय :- एम.फिल् अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत.**

संदर्भ :- १. उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र क्र.F No.१०-१८/२०२४ (PS/Misc), दि.०२ जुलै, २०२५
२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक :- संकिर्ण-२२०४/ प्र.क्र.९१/विशि-१, दि.१८.०७.२०२५

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून एम.फिल्. पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांची एन.ई.टी. परीक्षा पास होण्याच्या अटीमधून सवलत मिळालेल्या अध्यापकांची यादी महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडून विद्यापीठास प्राप्त झाली आहे. सदर शिक्षकांची नावानिशी यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करीत आहोत.

**कळावे.**

आपला विश्वासू

**(जी.आर.पळसे)**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-१ विभाग**

सोबत :- वरीलप्रमाणे

D:\Changes in staff /sub /647

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२२०४/ प्र.क्र.९१/विशि-१ दिनांक:- १८.०७.२०२५

प्रति,

संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

विषयः-एम.फील. अर्हता धारण केलेल्या १४२१ अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत.

संदर्भ:-उपसचिव, विद्यापीठ अनुदान आयोग यांचे पत्र क्र. F No.१०-१८/२०२४ (PS/Misc), दिनांक २ जुलै, २०२५.

एम. फिल पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांना एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट द्यावी, अशी मागणी विविध संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली होती. त्यानुसार एम. फिल पदवी धारण केलेल्या अध्यापकांना एन.ई. टी. परीक्षेमधून सूट देण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास समक्रमांकाच्या दिनांक १५ जुलै, २०२४ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. त्यानुसार अशा प्रकरणांची तपासणी करण्यासाठी आयोगाकडून तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. आयोगाने नेमलेल्या समितीकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात आली आहे. समितीच्या शिफारशीनुसार, ११.०७.२००९ पूर्वी एम.फिल पदवी पूर्ण केलेल्या आणि १४ जून २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या, नियमित/कायमस्वरूपी सेवेत असलेल्या, १४२१ शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) मधून सूट देण्याचा निर्णय, आयोगाच्या, २४.०६.२०२५ रोजी झालेल्या ५९१ व्या बैठकीत घेण्यात आला आहे. असे विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. २ जुलै, २०२५ च्या पत्राव्दारे कळविले आहे.

०२. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २ जुलै, २०२५ च्या पत्राची प्रत, सोबतच्या तक्त्यासह आपल्याकडे पाठविण्यात येत आहे. तसेच याबाबत संक्षिप्त माहितीचा तक्ता परिशीष्ट-अ अन्वये सोबत जोडला आहे. त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करुन त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

(प्रताप पां. लुबाळ)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:-वरीलप्रमाणे

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित

१)कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.
२)सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
३)निवड नस्ती (विशि-१)

E:\Vinayak Vishi-१....docx

परीशिष्ट-अ

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | विद्यापीठ अनुदान आयोगाने पात्र ठरविलेल्या उमेदवारांचा अनुक्रमांक | विद्यापीठ अनुदान आयोगाने अपात्र ठरविलेल्या उमेदवारांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १-१६ आणि १८-२८ | १७ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर | २९-१२५ आणि १२७-१३४ आणि १३६-१५९ आणि १६१-२०३ आणि २०५-२६४ आणि २६६-२७३ आणि २७५ आणि २७९-२८९ आणि २९२-३२९ आणि ३३१, ३३३-३३९ आणि ३४१-३४६ | १२६, १३५, १६०, २०४, २६५, २७४, २७६, २७७, २७८, २९०, २९१, ३३०, ३३२, ३४० |
| ३ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | ३४७-४०७ आणि ४०९-४१० आणि ४१२-४३० आणि ४३२-४७५ आणि ४७७-४९७ आणि ५००-५०३ आणि ५०६-५०७ आणि ५०९-५४४ | ४०८, ४११, ४३१, ४७६, ४९८, ४९९, ५०४, ५०५, ५०८ |
| ४ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | ५४५-६३० आणि ६३२-७३४ आणि ७३६-९२३ आणि ९२५-९२७ आणि ९३०-९३२ | ६३१, ७३५, ९२४, ९२८, ९२९ |
| ५ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | ९३३-१००५६ | १०५७ |
| ६ | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | १०५८-१०९६ आणि १०९८-११०८ आणि १११०-१११९ आणि ११२१-११७२ आणि ११७५-११९६ आणि ११९८-१२०० | १०९७, ११०९, ११२०, ११७३, ११७४, ११९७ |
| ७ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | १२०१-१२२९ आणि १२३१-१२७० आणि | १२३० |
| ८ | शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर | १२७१-१२८६ आणि १२८८-१३१९ आणि १३२६-१३३५ आणि १३३७-१३५५ आणि १३५७-१३५९ आणि १३६३ आणि १३६५-१३७५ | १२८७, १३२०-१३२५, १३३६, १३५६, १३६०, १३६१, १३६२, १३६४, |
| ९ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर | १३७६-१४०१ | - |
| १० | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | १४०२-१४५६ | - |
| ११ | श्रीमती नाथिबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई | १४५७-१४५९ | - |
| १२ | शासकीय महाविद्यालय | १४६०-१४७१ | - |
| | एकूण उमेदवारांची संख्या | १४२१ | ५० |

E:\Vinayak Vishi-१....docx